# प्राचार्य हे विद्यार्थी, संस्थेच्या विकासामधील महत्त्वाचा घटक : कुलगुरू

**कोल्हापूर (प्रतिनिधी) :** प्राचार्य हे विद्यार्थी व संस्थेच्या विकासामधील महत्त्वपूर्ण घटक आहेत, असे प्रतिपादन कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी केले. विद्यापीठात ॲकॅडमी आफॅ ॲकॅडमिक ॲडमिनिस्ट्रेटर' या नवनियुक्त प्राचार्यांच्या कार्यशाळेत उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले, व्यवस्थापन, अध्यापन, विद्यार्थ्यांची अपेक्षापूर्ती अशा विविध आघाड्यांवर प्राचार्यांना काम करावे लागते. त्यामुळे प्राचार्य पद हे विविधांगी दृष्टिकोनाने विकासात्मक व्यक्तिमत्त्व असते. यावेळी माजी कुलगुरू डॉ.एस. एच. पवार, प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ.विलास नांदवडेकर, माजी वित्त व लेखाधिकारी बी. एस. पाटील आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे आयोजन एमबीए अधिविभागाचे संचालक डॉ. एच. एम. ठकार यांनी केले.

पुढारी

# शिवाजी विद्यापीठ विद्युत रोषणाईने उजळले...



कोल्हापूर : शिवजयंती व दीक्षांत समारंभानिमित्ताने शिवाजी विद्यापीठाच्या मुख्य इमारतीला अशी आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली होती. (छाया : नाज ट्रेनर)

पुढारी

# महाविद्यालयीन पातळीवर आता पदवी प्रदान समारंभ

## व्यवस्थापन परिषद बैठकीत निर्णय

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ एकरूप नियम क्र. ४ (दीक्षांत समारंभ) नुसार विद्यापीठ व महाविद्यालय पातळीवर पदवीप्रदान समारंभासाठी अनुसरावयाच्या कार्यपद्धतीस शिवाजी विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेत मान्यता देण्यात आली.

विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेची बैठक सोमवारी (दि.१८) कुलगुरू प्रा. डॉ. देवानंद शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली व प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के आणि व्यवस्थापन परिषद सदस्य यांच्या प्रमुख उपस्थितीत झाली. सदस्य सचिव म्हणून प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी बैठकीचे कामकाज पाहिले. या बैठकीत विविध विषयांवर निर्णय घेण्यात आले.

महाविद्यालयीन शिक्षकांच्या सहयोगी प्राध्यापक स्टेज ४ (एजीपी ९०००) व प्राध्यापक स्टेज ५ (एजीपी १००००) पदासाठी पदोन्नतीबाबत केंद्रीय पद्धतीने सध्या निवड प्रक्रिया विद्यापीठात राबविण्यास मान्यता देण्यात आली. विद्यापीठ संलग्न महाविद्यालय नियतकालिक स्पर्धा २०१७-१८ च्या स्पर्धेचे परिनिरीक्षक राज्यशास्त्र विभागातील प्रा. डॉ. भारती पाटील यांचा नियतकालिक स्पर्धेचा निकाल जाहीर करण्यास व परिनिरीक्षण अहवालास मान्यता देण्यात आली. तसेच तंत्रज्ञान अधिविभागातील एम.टेक. (कॉम्प्युटर सायन्स अँड टेक्नॉलॉजी, इलेक्ट्रॉनिक्स टेक्नॉलॉजी, फूड टेक्नॉलॉजी, एन्व्हायरमेंटल सायन्स अँड टेक्नॉलॉजी, एनर्जी टेक्नॉलॉजी) या पाच अभ्यासक्रमासाठी प्रत्येकी एक हंगामी चेअर प्रोफेसर पद निर्माण करण्यास व्यवस्थापन परिषद बैठकीत मान्यता देण्यात आली. महाविद्यालयीन पातळीवर पदवीप्रदान समारंभ घेण्यासाठी व्यवस्थापन परिषदेने मान्यता दिली आहे.

### विद्यापीठात दीक्षांत समारंभाची तयारी सुरू

शिवाजी विद्यापीठ दीक्षांत समारंभाच्या पार्श्वभूमीवर विद्यापीठात परिसराची स्वच्छता, रंगरंगोटी, मंडप बांधणी कामास सुरुवात झाली आहे. विद्यापीठाचा ५५ वा दीक्षांत समारंभ शुक्रवार (दि.२२) रोजी दुपारी १.३० वाजता होणार आहे. समारंभासाठी कुलपती तथा राज्यपाल सी. विद्यासागर राव, तिरूचिरापल्लीच्या भारतीय प्रबंध संस्थानचे भीमराया मेत्री हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. विद्यापीठातर्फे दीक्षांत समारंभाची तयारी सुरू असून विविध कमिट्यांचे कामकाज अंतिम टप्प्यात आले आहे. विद्यापीठातील रस्ते, मुख्य प्रशासकीय इमारत, छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारुढ पुतळ्याची रंगरंगोटी सुरू आहे. दीक्षांत समारंभात पीएच.डी., एम.फिल., विद्यापीठातील अधिविभाग, दूरशिक्षण केंद्रातील सुमारे २३०० विद्यार्थ्यांना विद्यापीठाच्या वितरण व्यवस्थेद्वारे पदवी प्रमाणपत्र वितरित केले जाणार आहे.

लोकमत

# महाविद्यालयांत होणार पदवी प्रदान

## विद्यापीठ व्यवस्थापन परिषदेची मान्यता : बैठकीत झाला निर्णय

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** पदवी अथवा पदविका अभ्यासक्रमाचे महाविद्यालयात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना त्यांचे पदवी प्रमाणपत्र त्या ठिकाणीच वितरित करण्याचा परिनियम नवीन विद्यापीठ कायद्यामध्ये आहे. त्यानुसार शिवाजी विद्यापीठ कार्यक्षेत्रातील महाविद्यालयांमध्ये पदवी प्रदान समारंभ घेण्यास विद्यापीठ व्यवस्थापन परिषदेने मान्यता दिली.

विद्यापीठ कार्यालयात कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली आणि प्र-कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के आणि व्यवस्थापन परिषद सदस्य यांच्या उपस्थितीत बैठक झाली. सदस्य सचिव म्हणून प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे होते. विद्यापीठ आणि महाविद्यालयीन पातळीवर पदवी प्रदान (ग्रॅज्युएशन सेरेमनी) समारंभासाठी अनुसरावयाच्या कार्यपद्धतीस मान्यता देण्यात आली. महाविद्यालयांतील पदवी प्रदान समारंभासाठीची नियमावलीला मान्यता देण्यात आली. त्यामध्ये या समारंभासाठी महाविद्यालयांना प्रत्येकी दहा हजार रुपयांचा निधी देण्याच्या नियमाचा समावेश आहे. तंत्रज्ञान अधिविभागातील एम. टेक्. कॉम्प्युटर सायन्स अँड टेक्नॉलॉजी, इलेक्ट्रॉनिक्स टेक्नॉलॉजी, फूड टेक्नॉलॉजी, एन्व्हायरमेंटल सायन्स अँड टेक्नॉलॉजी, एनर्जी टेक्नॉलॉजी या पाच अभ्यासक्रमांसाठी प्रत्येक एक हंगामी चेअर प्रोफेसर पद निर्माण करण्यास मान्यता देण्यात आली. महाविद्यालयीन नियतकालिक स्पर्धा २०१७-१८ च्या स्पर्धेचे परिनिरीक्षक प्रा. डॉ. भारती पाटील यांना नियतकालिक स्पर्धेचा निकाल जाहीर करण्यास, परिनिरीक्षण अहवालास मान्यता देण्यात आली.

### पदोन्नतीच्या प्रक्रियेला मान्यता

महाविद्यालयीन शिक्षकांच्या सहयोगी प्राध्यापक स्टेज फोर (एजीपी ९०००) प्राध्यापक स्टेज फाईव्ह (एजीपी १००००) पदासाठी पदोन्नतीबाबत केंद्रीय पद्धतीने निवड प्रक्रिया राबविण्यास या बैठकीत मान्यता देण्यात आली.

Kolhapur Main
Page No. 4 Feb 19, 2019
Powered by: erelego.com

सकाळ

# विद्यापीठ मुलांच्या संघास कबड्डीचे विजेतेपद

## मुलींच्या संघाला तृतीय क्रमांक; सौरभ कुलकर्णी ठरला सर्वोत्कृष्ट खेळाडू

**कसबा बावडा, ता. १८ :** मुंबई येथे झालेल्या राज्यस्तरीय आंतरविद्यापीठ क्रीडा महोत्सवात शिवाजी विद्यापीठाच्या मुलांनी यजमान मुंबई विद्यापीठाचा चार गुणांनी पराभव करून मुलांच्या कबड्डी स्पर्धेचे अजिंक्यपद पटकाविले, तर शिवाजी विद्यापीठाच्या मुलींच्या संघाने औरंगाबाद विद्यापीठाचा दोन गुणांनी पराभव करून स्पर्धेत तिसरा क्रमांक पटकावला. स्थानिक प्रेक्षकांच्या प्रोत्साहनावर मुंबई विद्यापीठाने सलग दोन पकडी करून शिवाजीवर दबाव आणला. त्यानंतर मात्र शिवाजीच्या सौरभ कुलकर्णी, अक्षय निकम, ऋषिकेश देसाई यांच्या खोलवर चढायांमुळे मुंबई विद्यापीठाचे क्षेत्ररक्षण खिळखिळे करून टाकले. मध्यंतरापर्यंत शिवाजी विद्यापीठाकडे आठ गुणांची आघाडी होती. मध्यंतरानंतर मात्र मुंबई विद्यापीठाच्या खेळाडूंनी चढाई व क्षेत्ररक्षणात आक्रमक धोरण अवलंबून शिवाजीच्या संघावर दबाव आणला. शिवाजीच्या मुख्य चढाईपटूच्या पकडी करत शिवाजीवर लोन दिला व सामन्यात बरोबरी साधली. त्यानंतर मात्र शिवाजीच्या अंगणात फक्त चार खेळाडू असताना सौरभने क्षेत्ररक्षणात दाखवलेली चमक आणि त्याने चढाईमध्ये ऐनवेळी बाद केलेले मुंबईचे गडी यामुळे शिवाजी विद्यापीठाने शेवटच्या चार मिनिटात वर्चस्व मिळवून सामना ३४-३८ असा चार गुणांनी जिंकला.

क्षेत्ररक्षणात अक्षय पाटील, सौरभ कुलकर्णी, प्रतीक पाटील हे चमकलेत. आपल्या अष्टपैलू खेळाने विजयात मोलाचा वाटा उचलणाऱ्या सौरभ कुलकर्णी याला स्पर्धेतील सर्वोत्कृष्ट खेळाडू म्हणून गौरविण्यात आले. मुलींच्या तिसऱ्या क्रमांकासाठी झालेल्या अटीतटीच्या सामन्यात शिवाजी विद्यापीठाच्या मुलींनी औरंगाबाद विद्यापीठाचा केवळ दोन गुणांनी पराभव करून स्पर्धेत तिसरा क्रमांक पटकावला.

### राज्यस्तरीय आंतरविद्यापीठ क्रीडा महोत्सव

**मुंबईला घरच्या मैदानावर हरविले**

काही दिवसांपूर्वी शिवाजी विद्यापीठात झालेल्या पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ कबड्डी स्पर्धेत सोलापूर विद्यापीठ व मुंबई विद्यापीठ यांनी पंचांच्या कामगिरीवर आक्षेप घेत सामना सोडला होता, पण या स्पर्धेत मात्र उपांत्य सामन्यात शिवाजी विद्यापीठाने सोलापूर विद्यापीठ ४५-२१ असे तब्बल २४ गुणांनी हरवून श्रेष्ठत्व सिद्ध केलेच, पण अंतिम सामन्यात मुंबई विद्यापीठाला त्यांच्याच क्रीडांगणावर हरवून आपण चॅम्पियन आहोत, हे सिद्ध केले.



**मुंबई : येथे झालेल्या राज्यस्तरीय आंतरविद्यापीठ क्रीडा महोत्सवातील विजेता शिवाजी विद्यापीठ मुलांच्या संघाबरोबर प्रशिक्षक.**

Kolhapur, Kolhapur-Today
19/02/2019 Page No. 7